तातडीचे (९२)

जा.क्र.माध्य-३[१४]नमाशा/मान्यता/पुणे/३.
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,
पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय
दिनांक:- ९ / ७ /१९९३

2 JUL 1993

प्रति,
सचिव,
डॉ. मामासाहेब मोहोळ विद्या विकास
मंडळ,पुणे जिल्हा पुणे

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन
माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ:- शासन पत्र क्र एसएसएन/१०९३/३४५०/माशि/१
दिनांक २ जुलै १९९३

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासून विना अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा,माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येतआहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे[उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतइ.]काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.]फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही.अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज]कायदा१९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

[५] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र [illegible] कार्यालयाकडे पाठविण्यात येईल

[६] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[७] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[८] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[९] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[१०] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यांत येईल.

[११] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यायावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[१२] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१३] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

__इतर अटी :-__

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून